| | |
|---|---|
| MHAU050005792026 | **नियमित दिवाणी दावा क्र.५२/२०२६**<br><br>कैलास जयवंतराव गुंजाळ<br>वि.<br>आशाबाई जयवंतराव गुंजाळ व ईतर. |

## नि.क्र. ०६/१ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरती प्रतिवादींनी दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. वादीतर्फे विव्दान वकील श्री. एम. एम. भंडारे व प्रतिवादींतर्फे विव्दान वकील श्री. एस. डी. बोढरे यांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व विभक्त होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा टंकलिखीत करतांना वादीने नजरचुकीमुळे दाव्यातील विषय, तसेच परिच्छेद क्र.४, ५, ८, १० आणि प्रार्थना कलम मध्ये वाद मिळकतीचे क्षेत्र ''०.०१.५० आर (०.०१.५० चौ. मीटर)'' असे लिहणे आवश्यक होते, परंतु तिथे चुकून ''०.०१.५० चौ.फुट'' असे लिहले गेले आहे. करिता, वादीने दाव्यातील विषय, तसेच परिच्छेद क्र.४, ५, ८, १० आणि प्रार्थना कलम मध्ये ''०.०१.५० चौ.फुट'' ऐवजी **''०.०१.५० आर (०.०१.५० चौ. मीटर)''** अशी दुरुस्ती करण्यासाठी विनंती केली आहे.

४. प्रतिवादींनी अर्जास योग्यतो आदेश होण्याची विनंती केली आहे.

५. सदरचा दावा वादीने वाटपासाठी दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये

अद्याप वादी व प्रतिवादींनी त्यांचा साक्षीपुरावा दाखल केलेला नाही. दावा हा प्राथमिक टप्यास प्रलंबित आहे. त्यामुळे अर्जात सुचवलेली दुरुस्तीची परवानगी दिल्यास उभय पक्षकारांवरती कसलाही अन्याय होणार नाही तसेच दाव्याच्या स्वरुपामध्ये काहीएक बदल होणार नाही असे माझे मत आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने मुदतीमध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KALE NILESH SUDAM
Date: 2026.03.13 12:11:25 +0530

**दिनांकः** १२.०३.२०२६.

**वैजापूर.**

एन. एस. काळे

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.**